ePaper
पालकमंत्री जाहीर: धनंजय मुंडेंना मोठा धक्का, अजित पवार पुणे आणि बीडचे पालकमंत्री



|| वर्ष - 8 | अंक -189 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 19 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- २३ वर्षीय खेळाडूचे चमकले नशीब!
- मोहम्मद सिराजला टीम इंडियातून डच्चू!
- अरविंद केजरीवाल यांच्या गाडीवर हल्ला
- न्यायालयाने संजय रॉयला ठरवलं दोषी!


## सावकारी जाचाला कंटाळून

# कुटुंबाचा सामूहिक आत्महत्येचा प्रयत्न!

### मुलाचा खून करून पती-पत्नीचा गळफास, पत्नीचा मृत्यू, पती बचावले

## तिघे गजाआड

| मुंबई | महाईन्यूज

**बीडच्या केजमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणी केसमध्ये वाल्मिक कराडला अटक झालेली आहे. कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचा आहे. खुद्द मुंडे यांनीदेखील तशी कबुली दिलेली आहे. भाजप आमदार सुरेश धस सातत्यानं आका असा उल्लेख मुंडे यांना लक्ष करत आहेत. अशा परिस्थितीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं मौन चर्चेचा विषय आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेले अजित पवार शांत का? असा प्रश्न राजकीय वर्तुळातील सगळ्यांनाच पडला आहे.**



पिंपरी दि, 18 (प्रतिनिधी) - व्याजाने घेतलेल्या पैशांची परतफेड करून आणि जमीन लिहून दिल्यानंतरही वाढीव पैशांसाठी सावकारांनी तगादा लावल्याने एकाच कुटुंबातील तिघांनी झोपेच्या गोळ्या खात आत्महत्येचा प्रयत्न केला. वडिलांनी मुलाचा गळा दाबून खून केला. त्यानंतर पती-पत्नीने गळफास घेतला. त्यात पत्नीचा मृत्यू झाला. तर, पती बचावले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. ही घटना शुक्रवारी (दि.17) रात्री साडेनऊच्या सुमारास चिखलीत घडली. याप्रकरणी पोलिसांनी तीन सावकारांना गजाआड केले आहे. धनराज वैभव हांडे (वय 10) असे खून झालेल्या मुलाचे, शितल वैभव हांडे (वय-41) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. बचावलेले महिलेचे पती वैभव मधुकर हांडे (वय -50, सर्व रा. सोनावणे वस्ती, चिखली) यांनी याप्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार संतोष पांडुरंग कदम (वय 48, रा. ताथवडे), संतोष दत्तात्रय पवार (वय 49, रा. कुदळवाडी, चिखली) आणि जावेद मेहबूब शेख (वय-36,रा. मोई, ता. खेड, जि. पुणे) यांना अटक केली आहे. तर, वैभव यांच्या विरोधात मुलाच्या खूना प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत चिखली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांनी माहिती दिली. आरोपी संतोष कदम याच्याकडून फिर्यादी यांनी व्यावसायासाठी सहा लाख, संतोष पवारकडून दोन लाख रुपये 10 टक्के दरमहा व्याजाने घेतले होते. आरोपी जावेद शेख याच्याकडून चार लाख रुपये व्याजाने घेतले होते. फिर्यादी यांनी आरोपी संतोष कदमला रकमेची परतफेड म्हणून 9 लाख 50 हजार रुपये दिले. तसेच फिर्यादी यांच्या नावावर असलेली एक एकर जमीनही लिहून दिली होती. आरोपी संतोष पवारला व्याजाची दरमहा 20 हजार रुपये देऊन स्वतःच्या मालकीची 20 गुंठे जमीन लिहून दिली होती. त्यानंतरही पवारने 14 लाख रुपये दिल्याशिवाय जमीन परत देणार नाही, असा तगादा लावला. आरोपी जावेद शेख याने दिलेल्या कर्जापोटी व्याज म्हणून चार लाख 50 हजार रुपये दिले. त्यानंतरही आरोपींनी व्याजाचे पैसे देण्यासाठी हांडे यांच्याकडे तगादा लावला. फिर्यादी हांडे यांना शिवीगाळ व दमदाटी करून त्यांचा शारीरिक व मानसिक छळ केला. सावकारांच्या या त्रासाला कंटाळून त्यांनी सामुहिक आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्याच मेडिकलमधून झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. हांडे यांनी मुलगा धनराज यांचा गळा दाबून खून केला. त्यानंतर पती-पत्नीने छताच्या पंख्याला गळफास घेतला. यात पत्नी शितल यांचा मृत्यू झाला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच चिखली पोलीस घटनास्थळी दाखल झाले. वैभव हे जिवंत असल्याचे दिसून येताच त्यांना त्वरीत त्यांना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केल्याने त्यांचे प्राण वाचले. चिखली पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## भावाला पाठविली चिट्टी

शितल यांनी आत्महत्या करण्यापूर्वी ठाण्याला राहणारा भाऊ अमित गाढवेला मोबाइलवर सुसाइड नोट (चिट्टी) पाठविली होती. भावाने चिट्टी पाहताच चिखली पोलिसांना दूरध्वनी केला. पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. दरवाजा तोडून पोलीस घरात गेले असता धनराज खाटेवर पडला होता. तर, शितल आणि वैभव लटकलेल्या अवस्थेत होते. दोघांनाही खाली उतरवले असता वैभव यांचा श्वास चालू होता. त्यांना तत्काळ खासगी रुग्णालयात दाखल केले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

> “ याप्रकरणी तीन सावकारांना अटक केली आहे. फिर्यादीच्या विरोधात मुलाच्या खूनाप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
>
> **-डॉ. शिवाजी पवार,** पोलीस उपायुक्त.

## मंत्री ना. धनंजय मुंडे यांचे दोर कापले...

### अजितदादांच्या एन्ट्रीने बीडमध्ये साफसफाई होणार?

| मुंबई | प्रतिनिधी : महाईन्यूज

मंत्रिमंडळ विस्तार आणि मंत्र्यांच्या खाते वाटपानंतर नव्या पालकमंत्र्यांच्या नावाची कधी घोषणा होणार याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. अखेर पालकमंत्रिपदाची यादी जाहीर करण्यात आली आहे. मंत्री धनंजय मुंडे यांना मोठा धक्का बसला आहे.



धनंजय मुंडे यांचं नाव पालकमंत्रिपदाच्या यादीतून वगळण्यात आलं आहे. गेल्यावेळी धनंजय मुंडे यांच्याकडे बीडचं पालकमंत्रिपद होतं मात्र यावेळी त्यांना पालकमंत्रिपद मिळालं नसून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पालकमंत्री म्हणून बीडची सूत्रं आपल्या हातात घेतली आहेत. तर मंत्री पंकजा मुंडे यांना जालन्याचं पालकमंत्रिपद देण्यात आलं आहे.

## धनंजय मुंडेंना धक्का

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आली, या घटनेनं बीडसह राज्यभरात खळबळ उडाली आहे. महाराष्ट्रात वातावरण चांगलंच तापलं आहे. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची देखील मागणी होत आहे. हाच मुद्दा पकडून विरोधकांकडून सरकारच्या कोंडीचे प्रयत्न सुरू आहेत. नैतिकतेच्या आधारावर धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांकडून होत होती.

# पर्यावरण नियमांमुळे गृहनिर्माणची कोंडी!

## नियामक संस्थांकडून वाढलेल्या कारवाईवर 'क्रेडाई'चे बोट

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पर्यावरणविषयक नियमांच्या नावाखाली विकसकांच्या विरोधात तक्रार करण्याचे प्रमाण अलीकडे वाढले आहे. या तक्रारींच्या आधारे नियामक संस्थांकडून विकसकांना नोटीस बजाविण्यातही वाढ झाली आहे. याचबरोबर जाचक नियमांमुळे अनेक प्रकल्प रखडले आहेत, असे मुद्दे क्रेडाई-पुणे मेट्रोने शुक्रवारी उपस्थित केले.**



क्रेडाईच्या वतीने आयोजित पुणे प्रॉपर्टी एक्स्पोचे उद्घाटन केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी क्रेडाई-पुणे मेट्रोचे अध्यक्ष रणजित नाईकनवरे, उपाध्यक्ष अरविंद जैन व मनीष जैन, व्यवस्थापन समितीचे सदस्य जे. पी. श्रॉफ व पुनीत ओसवाल, पर्यावरण समितीचे सहअध्यक्ष मनीष कनेरिया आणि माध्यम विभागाचे कपिल गांधी आदी उपस्थित होते.या वेळी शहरातील वाढते प्रदूषण आणि बांधकाम क्षेत्रावर अलीकडच्या काळात झालेल्या कारवाईचा मुद्दा उपस्थित झाला. राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यमापन प्राधिकरणाकडे पुण्यातील शंभरहून अधिक मोठे बांधकाम प्रकल्प अडकले आहेत. याचबरोबर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून शहरातील अनेक विकासकांना नोटीस बजाविण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर हा प्रकार वाढल्याचे निरीक्षण कनेरिया यांनी नोंदविले. विकासकांकडून नियमांचे पालन केले जात असून, काही कार्यकर्ते विकासकांना लक्ष्य करीत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. नियामक संस्थांकडून नोटीस मिळाल्यानंतर विकासक त्रुटी दूर करीत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या वेळी नाईकनवरे म्हणाले, की हवा प्रदूषणात वाहनांमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा वाटा अधिक आहे. रस्त्यांवर सुरू असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ निर्माण होऊन प्रदूषण होत आहे. विकासकांसाठी महापालिकेची नियमावली आहे. या नियमावलीची अंमलबजावणी विकासकांकडून होते की नाही, याची तपासणी सातत्याने महापालिकेची पथके करतात. त्यामुळे विकासकांकडून प्रदूषण होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे.या वेळी मुरलीधर मोहोळ म्हणाले, की पुण्यातील वाहतूककोंडी कमी करण्यावर आगामी काळात भर राहणार आहे. यासाठी नवीन रस्त्यांच्या बांधणीसोबत पायाभूत सुविधांच्या उभारणीला गती देण्यात येणार आहे. नवीन विमानतळाबाबतही पावले उचलण्यात येत आहेत. शहराचा विस्तार होत असल्याने पाण्याची गरज वाढत आहे. यामुळे १ हजार ८०० किलोमीटर लांबीच्या नवीन जलवाहिन्या बसविण्यात येणार आहेत. सरकारने गृहनिर्माण क्षेत्रावरील कर कमी केल्यास घरांच्या किमती कमी होऊन ग्राहकांना फायदा होईल. याचबरोबर ग्राहकांसाठी गृहकर्जावरील सवलतीची रक्कमही सरकारने वाढवावी. यातून परवडणाऱ्या घरांची विक्री वाढण्यास मदत होईल.क्रेडाईच्या

### पायाभूत सुविधांच्या उभारणीला गती

या वेळी मुरलीधर मोहोळ म्हणाले, की पुण्यातील वाहतूककोंडी कमी करण्यावर आगामी काळात भर राहणार आहे. यासाठी नवीन रस्त्यांच्या बांधणीसोबत पायाभूत सुविधांच्या उभारणीला गती देण्यात येणार आहे. नवीन विमानतळाबाबतही पावले उचलण्यात येत आहेत.

वतीने आयोजित पुणे प्रॉपर्टी एक्स्पोचे उद्घाटन केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी क्रेडाई-पुणे मेट्रोचे अध्यक्ष रणजित नाईकनवरे, उपाध्यक्ष अरविंद जैन व मनीष जैन, व्यवस्थापन समितीचे सदस्य जे. पी. श्रॉफ व पुनीत ओसवाल, पर्यावरण समितीचे सहअध्यक्ष मनीष कनेरिया आणि माध्यम विभागाचे कपिल गांधी आदी उपस्थित होते.या वेळी शहरातील वाढते प्रदूषण आणि बांधकाम क्षेत्रावर अलीकडच्या काळात झालेल्या कारवाईचा मुद्दा उपस्थित झाला. राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यमापन प्राधिकरणाकडे पुण्यातील शंभरहून अधिक मोठे बांधकाम प्रकल्प अडकले आहेत. याचबरोबर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून शहरातील अनेक विकासकांना नोटीस बजाविण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर हा प्रकार वाढल्याचे निरीक्षण कनेरिया यांनी नोंदविले. विकासकांकडून नियमांचे पालन केले जात असून, काही कार्यकर्ते विकासकांना लक्ष्य करीत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. नियामक संस्थांकडून नोटीस मिळाल्यानंतर विकासक त्रुटी दूर करीत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या वेळी नाईकनवरे म्हणाले, की हवा प्रदूषणात वाहनांमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा वाटा अधिक आहे. रस्त्यांवर सुरू असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ निर्माण होऊन प्रदूषण होत आहे. विकासकांसाठी महापालिकेची नियमावली आहे. या नियमावलीची अंमलबजावणी विकासकांकडून होते की नाही, याची तपासणी सातत्याने महापालिकेची पथके करतात. त्यामुळे विकासकांकडून प्रदूषण होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे.

# उद्योजकता परिषदेत डॉ. पी. डी. पाटील यांचा सन्मान

## उद्योग विश्व: महाराष्ट्राचे उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांची प्रमुख उपस्थिती

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**येथे नुकत्याच झालेल्या 'ग्लोबल आंत्रप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्ह २०२५' मध्ये डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांना लिव्हींग लिजंड ऑनर ने सन्मानाने गौरवण्यात आले. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते डॉ. पाटील यांना विशेष स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.**




ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, ज्येष्ठ विचारवंत संदीप वासलेकर, ज्येष्ठ उद्योजक प्रतापराव पवार, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष व परिषदेचे मुख्य संयोजक सचिन ईटकर यांची उपस्थिती या कार्यक्रमाला होती. परिषदेचे उद्घाटन केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने झाले. महाराष्ट्राचे उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांची प्रमुख उपस्थिती कार्यक्रमाला होती. डॉ. डी. वाय. पाटील संस्थेने पिंपरी-चिंचवडमध्ये १९८४ साली पहिले इंजिनिअरींग महाविद्यालय सुरू केले. त्याची जबाबदारी डॉ. पी. डी. पाटील यांच्यावर होती. पिंपरी-चिंचवडच्या औद्योगिक नगरी म्हणून उभारणीच्या काळात डॉ. पाटील यांच्या शिक्षणसंस्थांनी उच्चशिक्षित मनुष्यबळाचा पुरवठा केला त्यामुळे या शहराचा लौकिक जागतिक स्तरावर वाढला. त्याचे श्रेय गेली ४० वर्षे अविरत कष्ट करणाऱ्या डॉ. पाटील यांना अधिक आहे, अशा शब्दांत संयोजकांनी डॉ. पाटील यांचा गौरव केला.

### उद्योजक-व्यावसायिक प्रतिनिधींना मार्गदर्शन

पिंपरी-चिंचवड विद्यापीठ, गर्जे मराठी ग्लोबल आणि महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिल (MEDC) यांनी संयुक्तपणे पुण्यात आयोजित केलेली दोन दिवसांची 'ग्लोबल आंत्रप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्ह २०२५' कमालीची यशस्वी ठरली. जगभरातून आलेल्या तसेच देशातील १३०हून अधिक श्रेष्ठतम तज्ज्ञ पॅनलिस्ट वक्त्यांनी उपस्थित असलेल्या दीड हजारांहून अधिक उद्योजक-व्यावसायिक प्रतिनिधींना मार्गदर्शन केले.

# ‘रिव्हर सायक्लोथॉन’ द्वारे इंद्रायणी स्वच्छतेचा होणार जागर!

## मंत्री महोदय यांची उपस्थिती, उद्या भोसरीमध्ये निघणार विश्वविक्रमी सायकल रॅली

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन-2025’’ च्या माध्यमातून पवित्र इंद्रायणी नदी स्वच्छतेचा जागर करण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकारमधील मंत्री महोदय यांच्यासह राजकीय, अध्यात्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या रॅलीची जय्यत तयारी करण्यात आली आहे.**




भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून प्रतिवर्षी आयोजित विश्वविक्रमी इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन-2025 उद्या, रविवार, दि. 19 जानेवारी 2025 रोजी सकाळी 6 वाजता भोसरी येथील ऐतिहासिक गावजत्रा मैदानातून सुरू होणार आहे.

या भव्य रॅलीसाठी प्रमुख पाहुणे म्हणून उत्तरप्रदेश येथील प्रभू श्रीराम मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज, केंद्रीय कामगार व रोजगार, युवक आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय, केंद्रीय नागरी वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय युवक व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डिड्डू, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, प्रसिद्ध अभिनेता व दिग्दर्शक प्रवीण तरडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, अविरत श्रमदान, सायकल मित्र पणे, महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन, शिवांजली सखी मंच, सारथी हेल्पलाईन यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्था, संघटना आणि पर्यावरण प्रेमी स्वयंसेवकांच्या पुढाकाराने ‘‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’’ आयोजित केली जाते.

### रिव्हर सायक्लोथॉनचा मार्ग पुढीलप्रमाणे

- 5 किमी रॅली मार्ग : गावजत्रा मैदान, भोसरी- डी.पी. लांडगे पेट्रोल पंप- इंद्रायणीनगर- गावजत्रा मैदान भोसरी.
- 15 किमी रॅली मार्ग : गावजत्रा मैदान, भोसरी- जय गणेश साम्राज्य- क्रांती चौक- स्पाईन सिटी चौक- गवळीमाथा- गावजत्रा मैदान भोसरी.
- 25 किमी रॅली मार्ग : गावजत्रा मैदान, भोसरी- जय गणेश साम्राज्य- कृष्णानगर- स्पाईन सिटी चौक- गवळीमाथा- गावजत्रा मैदान, भोसरी.

> ‘‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’’ गेल्या ९ वर्षांपासून आयोजित केली जाते. नदी स्वच्छता हा निरंतर चालणारा उपक्रम असून यामध्ये जनसहभाग अतिशय महत्त्वाचा आहे. यंदा पिंपरी-चिंचवड पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून आपण वाहतूकीचे नियम, रस्ता सुरक्षा या थीमवर आधारित इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’ आयोजित केली आहे. भारतीय संस्कृती आणि अध्यात्माचे प्रतिक महाकुंभ मेळा प्रयागराज, उत्तरप्रदेश येथे होत आहे. यंदाची रॅली महाकुंभ मेळाला समर्पित केली आहे. भक्ती-शक्ती-परंपरा असे घोषवाक्य आहे. अधिकाधिक नागरिकांनी या रॅलीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करीत आहोत.
> **-महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# ‘पर्पल जल्लोष’मध्ये ‘फॅशन शो’ने लक्ष वेधले

## ‘रॅम्प वॉक, फॅशन शो’ मधून दिव्यांग बांधव म्हणाले; ‘वाय नॉट अस...!’

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रॅम्पवरून सांस्कृतिक जगताकडे टाकलेले पाऊल... प्रत्येक पावलात दिसून येणारा आत्मविश्वास... सौंदर्याला भूरळ पडेल अशी चेहऱ्यावरील आश्वासक भावना... अन्‌ रसिकांची उत्स्फुर्तपणे मिळालेली दाद... हे विलोभनीय दृश्य ‘पर्पल जल्लोष’ कार्यक्रमात सादर झालेल्या ‘वाय नॉट अस!’ या फॅशन शो च्या माध्यमातून दिसून आले.**



पिंपरी चिंचवड महापालिका आणि दिव्यांग भवन यांच्या वतीने दिव्यांग बांधवांसाठी १७ जानेवारी ते १९ जानेवारी २०२५ याकाळात ‘पर्पल जल्लोष’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. चिंचवड येथील ऑटो क्लस्टर प्रदर्शन केंद्र येथे सुरू असलेल्या या कार्यक्रमामध्ये दिव्यांग व्यक्तींकडून ‘वाय नॉट अस’ या फॅशन शोचे सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमास केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाचे सचिव राजेश अगरवाल, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, उप आयुक्त विठ्ठल जोशी, अण्णा बोदडे, संदीप खोत, , दिव्यांग भवन फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, सल्लागार विजय कान्हेकर, अभिजित मुरुगकर, दिव्यांग संघटनेचे प्रतिनिधी मानव कांबळे, दत्तात्रय भोसले, राजेंद्र वाघचौरे, संगीता जोशी तसेच विविध राज्यातील दिव्यांग कल्याण आयुक्त यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फॅशन शो मध्ये संगीता जोशी-काळभोर, भाग्यश्री मोरे, जयश्री भोसले, संगीता सुपल, आशा माने, वैशाली पवार, वैशाली शिंदे, प्रशांत नागे, प्रशीश शेट्टी, संकल्प बोत्रे, शिल्पा पांचाळे, जान्हवी जवळगे, प्रदीप साखरे, राजेश जाधव, बाबूराव अहिरे या दिव्यांग कलाकारांनी सहभाग घेतला होता. दिव्यांग व्यक्तींच्या या फॅशन शो च्या निमित्ताने त्यांना रॅम्पवर चालताना बघणे, हे इतरांसाठी प्रेरणादायी ठरले. दिव्यांगांचा आत्मविश्वास देखील यातून दिसून आला.

### पर्पल जल्लोष मधून सामाजिक बदल घडेल -शेखर सिंह

पर्पल जल्लोष महाउत्सवात दिव्यांग व्यक्तींचा फॅशन शो कार्यक्रम आयोजित करण्यामागे दिव्यांग व्यक्तींना प्रेरणा देणे, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवणे, त्यांच्यातील कलागुणांना वाव देणे, हा होता. हा शो फॅशनच्या पलीकडे जाऊन समावेशकतेचा संदेश देणारा ठरला आहे. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारा हा फॅशन शो ठरला असून यामध्ये सहभागी झालेल्या कलाकारांचा आत्मविश्वास हा वाखण्याजोगा आहे. असे आयुक्त शेखर सिंग यांनी सांगितले.




# यूजीसीच्या दोन अधिसूचना चर्चाग्रस्त

**विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्रसिद्ध केलेल्या दोन अधिसूचनांची सध्या शिक्षणविश्वात चर्चा सुरू आहे. 'यूजीसी'कडून दिल्या जाणाऱ्या अनुदानासह काही विशेष सुविधा आणि महाविद्यालयांना स्वायत्ततेसारखे विशेषाधिकार प्राप्त करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी 'नवीन शैक्षणिक धोरणा'ची अंमलबजावणी कशी केली, याचे मूल्यमापन होईल, ही त्यातील पहिली.**

मुळात राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद अर्थात 'नॅक'सारखी स्वतंत्र संस्था उच्च शिक्षण संस्थांच्या मूल्यांकनासाठी कार्यरत असताना, 'यूजीसी'ने मूल्यमापनासाठी अन्य काही निकष तयार करण्याचा प्रयत्न का करावा, असाच प्रश्न आहे. त्यामुळे याला विरोध होणार हे स्वाभाविक आहे.दुसरी अधिसूचना आहे, ती महाविद्यालये व विद्यापीठांतील प्राध्यापक भरती, पदोन्नती आणि विद्यापीठातील कुलगुरूंच्या निवडीच्या संदर्भात. या संदर्भात, नव्या अधिनियमांचा एक मसुदा तयार करण्यात आला आहे आणि या प्रस्तावित तरतुदींवर येत्या ५ फेब्रुवारीपर्यंत सूचना मागविण्यात आल्या असून, त्यांचा विचार करून या अधिनियमांना अंतिम स्वरूप दिले जाईल. 'यूजीसी'च्या या प्रस्तावित मसुद्यातील प्राध्यापक, प्राचार्य निवड-पदोन्नती आणि कुलगुरू नियुक्ती याबाबतच्या तरतुदी व्यवस्थितपणे अभ्यासाव्या




लागणार आहेत. त्यात कंत्राटी प्राध्यापक नेमण्याच्या कमाल संख्येवरील, प्राध्यापकांच्या एकूण जागांपैकी १० टक्के, ही अट काढून टाकली आहे. म्हणजे आता जितक्या जागा रिक्त, तितके कंत्राटी प्राध्यापक नियुक्त करता येतील. हे असे केल्याने नियमित प्राध्यापकांच्या जागा भराव्या न लागून त्यांना द्यावयाच्या लाभाचे पैसे वाचतील, असा तर हा विचार नाही ना, असा प्रश्न पडतो. यामुळे उच्च शिक्षणाचे आणखी खासगीकरण होऊ शकेल. सहायक प्राध्यापक नेमणुकीसाठी निकषांचे तीन पर्याय आहेत. पीएच.डी. वा नेट-सेट पात्रता हवी, असे पहिले दोन पर्याय आहेत. तिसरा पर्याय मात्र पदव्युत्तर पदवीला ५५ टक्के एवढी पात्रताही पुरेल, असे सांगतो. या प्रस्तावित अटींमुळे बरेच वादंग होत आहेत. चांगला शैक्षणिक दर्जा असलेल्या विद्यापीठातून ५५ टक्के गुणांनी पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी आणि चांगला शैक्षणिक दर्जा नसलेल्या विद्यापीठातून ५५ टक्के गुणांनी पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी यांच्यात समानता कशी राहील? त्याचप्रमाणे खासगी विद्यापीठे आणि शासकीय विद्यापीठे यांच्या पदव्युत्तर पदवीमध्ये साम्य कसे असेल? शिवाय, शिकविण्याचे कौशल्य, संवाद कौशल्य याचाही प्राध्यापक निवडीत विचार केला पाहिजे. त्यांचा विचार अधिसूचनेत नाही. नेट-सेटची अट अत्यंत महत्त्वाची आहे. ती वगळू नये. पीएच.डी.बाबतीतही अनेक गैरप्रकार झालेले आहेत, होतात. अनेक विद्यापीठांमध्ये पीएच.डी. पदवी मिळविण्यात महिला विद्यार्थ्यांना त्रास होतो. अनेक विद्यापीठांमध्ये तर बोगस पद्धतीने पीएच.डी. दिलेल्या आहेत. प्रस्तावित तरतुदींमधील कुलगुरू निवडीच्या निकषांवरून आणि पद्धतीवरून मात्र वादंग निर्माण होत असल्याचे दिसते. कुलगुरूपदाची निवड करताना, त्यासाठी नेमायच्या शोध समितीचे अधिकार कुलपतींकडे देण्याचे प्रस्तावित आहे. कुलपती म्हणजे पर्यायाने राज्यपालांकडे अधिकार, आणि राज्यपाल केंद्राने नेमलेले असल्याने कुलगुरू निवडीत थेट केंद्राचा राजकीय हस्तक्षेप होतील, असे वाटते. त्यामुळे या तरतुदीचे योग्य असे स्पष्टीकरण 'यूजीसी'ला द्यावे लागेल. पण, कुलगुरू निवडीतील राजकीय हस्तक्षेप हा विषय जुना आहे, तो आताच उपस्थित झाला आहे, असे नाही. यामुळे यापूर्वीही अनेक विद्यापीठांना अकार्यक्षम कुलगुरू मिळालेले आहेत. प्रस्तुत लेखकाला महाराष्ट्राच्या त्या-त्या वेळच्या राज्यपालांनी चार वेळा कुलगुरूपदाच्या मुलाखतीसाठी बोलावले होते. परंतु, कुलगुरूपदाचे निकष पूर्ण करीत असतानादेखील राजकीय हस्तक्षेपामुळे कुलगुरू म्हणून नियुक्ती होत नाही, असा अनुभव आहे. माझ्यासारख्याच इतर अनेक गुणवंत व्यक्तींना या अनुभवाला सामोरे जावे लागले आहे.कुलगुरूपदासाठी अध्यापनाची विशेषतः गेल्या काही वर्षांत कुलगुरूंच्या कामाचे स्वरूप केवळ शैक्षणिक राहिलेले नसताना आणि कुलगुरूंना आर्थिक, शैक्षणिक, प्रशासकीय अशा वेगवेगळ्या स्तरांवर आपली योग्यता सिद्ध करणे आवश्यक असताना हे बदल सकारात्मक वाटतात.

## प्रासंगिक »

# सुधारणांचे वारे!

***रसद पुरवठ्यासाठी सैन्यदलांत खेचरांचा वापर बंद होऊन ते काम ड्रोनवाटे केले जाणार या वृत्ताचा पुढचा अपरिहार्य भाग होता, सैन्यदलातील वाढते आधुनिकीकरण.. त्याचीच चर्चा***

जगाच्या नकाशात भारत कसा दिसतो? त्याचे भौगोलिक स्थान आणि आकारमान महत्त्वाचे का ठरते? जी बलस्थाने भारताला प्रादेशिक शक्ती म्हणून बळ देतात, ती तंत्रज्ञानाने बदललेल्या अनपेक्षित धोक्यांसाठी तयार आहेत का.. २१व्या शतकातील अशा सर्व आव्हानांना तोंड देण्यासाठी भारतीय सशस्त्र दलात धाडसी परिवर्तन व सेवांचे एकत्रीकरण होत आहे. कोणत्याही राष्ट्राचे भौगोलिक स्थान, आकारमान याचे काही फायदे-तोटे असतात. घनदाट जंगले, उत्तुंग पर्वतीय क्षेत्रे, वाळवंट, बर्फाळ प्रदेश, विस्तीर्ण समुद्रकिनारा अशा वैविध्यपूर्ण सीमांवर संरक्षण फळी मजबूत राखणे आव्हानात्मक ठरते. सभोवतालच्या घडामोडींचा प्रभाव लष्करी नियोजनावर पडतो.

**समाजाशी संबंधित कुठलेही कार्यक्षेत्र असो, त्याची गुणवत्ता सातत्याने तपासणे गरजेचे असते. त्यातही शिक्षण संस्थांची गुणवत्ता अधिक महत्त्वाची. यासाठी केंद्र सरकारचे शिक्षण मंत्रालय दर पाच वर्षांनी नॅक, एनबीए अशा राष्ट्रीय संस्थांच्या रँकिंगची घोषणा करते.**

# कशी वाढणार शिक्षणाची गुणवत्ता?

यात अपेक्षित रँकिंग आले नाही की या पद्धतीला नावे ठेवण्याची प्रथा आहे. तसे पाहिले तर संस्था जी माहिती, डेटा सबमिट करतात त्यावरच गुणदान करून ही क्रमवारी ठरविली जाते. आता कुणी खोटी माहिती दिली तर त्याची तथ्यता कशी तपासणार? खास करून प्लेसमेंट, रिसर्च पब्लिकेशन यात गोलमाल असण्याची शक्यता असते. आपल्याकडील विद्यापीठात होणाऱ्या संशोधनाचा दर्जा सुमार असतो. फार कमी प्राध्यापक आंतरराष्ट्रीय दर्जेदार जर्नलमधून पेपर्स प्रसिद्ध करतात. कारण तिथे तज्ज्ञांकडून कडक परीक्षण होते. आपल्याकडे पेपर्स प्रसिद्ध करणाऱ्या जर्नल्सचाही बाजार सुरू झाला आहे. पीएच.डीचे संशोधनही सुमार दर्जाचे झाले आहे. विद्यापीठाच्याही अनेक समस्या आहेत. बहुतेक ठिकाणी आवश्यकतेपेक्षा प्रत्यक्षात फार कमी नियमित प्राध्यापक असतात. अनेक वर्षे या



रिकाम्या जागा भरल्या जात नाहीत. आयआयटीसारख्या संस्था, सरकारी महाविद्यालयेही याला अपवाद नाहीत. कारण जाहिरात काढायला, नियुक्त्या करायला सरकारच्या परवानग्या मिळत नाहीत. कंत्राटी प्राध्यापकांच्या भरवशावर कसेतरी शिक्षण दिले जाते. अगदी परीक्षेच्या कामासाठीदेखील अर्हताप्राप्त प्राध्यापक उपलब्ध नसतात. वर्षानुवर्षे एकच प्राध्यापक असलेले विभाग विद्यापीठात आहेत. अध्ययनच नीट होणार नसेल तर संशोधन कोण, कसे करणार? विज्ञान तंत्रज्ञान विभागासाठी उत्तम आधुनिक प्रयोगशाळा लागतात. आजकाल अनेक उपकरणाची किंमत कितीतरी लाखात असते. विद्यापीठाच्या तुटपुंज्या संशोधन तरतुदीमध्ये हे शक्य नसते. विना अनुदानित महाविद्यालयातील प्रयोगशाळांची स्थिती अत्यंत केविलवाणी असते. विद्यार्थ्यांना प्रयोग न करताच उत्तीर्ण केले जाते. शिक्षण संस्थांतील एकूणच वातावरण अध्ययन, अध्यापन, संशोधन यासाठी पोषक नसल्याने विद्यार्थी वर्गात येतच नाहीत. वेगवेगळी प्रकरणे बाहेर काढण्यात अग्रेसर असलेल्या माध्यमांनी अचानक धडक देऊन या रिकाम्या वर्गांचे चित्रीकरण दाखवले पाहिजे. म्हणजे उच्च शिक्षण कुठल्या दिशेने चालले आहे याची सर्वांनाच कल्पना येईल. असेच परीक्षण ग्रंथालयात धूळ खात पडलेल्या पीएच. डी. प्रबंधाचेदेखील करावे. म्हणजे रँकिंग, गुणवत्ता राहिली बाजूला प्रत्यक्षात नेमके कसे, किती शिक्षण, संशोधन चालले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मंत्री धनंजय मुंडेंना धक्का!

## धनंजय मुंडे यांच्याकडे कोणत्याही जिल्ह्याचं पालकमंत्रिपद दिलं नाही

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यातील पालकमंत्री पदाची यादी आज (१८ जानेवारी) जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोली जिल्ह्याचं पालकमंत्रिपद असणार आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ठाणे आणि मुंबई शहर तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे आणि बीड जिल्ह्याचं पालकमंत्रिपद देण्यात आलं आहे. मात्र, पालकमंत्री पदाच्या यादीतून धनंजय मुंडे यांना वगळण्यात आलं आहे. धनंजय मुंडे यांच्याकडे कोणत्याही जिल्ह्याचं पालकमंत्रिपद देण्यात आलेलं नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी हा धक्का मानला जात आहे.**



बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेनंतर बीड जिल्ह्यात चांगलंच राजकारण तापलं आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरण आणि वाल्मिक कराड खंडणी प्रकरण यावरून सध्या बीडमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड सध्या पोलीस कोठडीत आहे, तर वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याची टीका विरोधकांकडून करण्यात आली आहे. त्यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांचा मंत्रिपदाचा राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी विरोधकांनी केली होती. तसेच बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद धनंजय मुंडे यांच्याकडे देण्यात येऊ नये, अशी मागणी देखील बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आमदार आणि स्थानिक नेत्यांनी केली होती. तसेच बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आमदारांनी बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद देवेंद्र फडणवीस किंवा अजित पवार यांनी स्वत:कडे घ्यावं, अशी मागणी देखील करण्यात आली होती. दरम्यान, अखेर आज पालकमंत्री पदाची यादी जाहीर झाली. यामध्ये बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे देण्यात आलं आहे. तसेच धनंजय मुंडे यांच्याकडे कोणत्याही जिल्ह्याचं पालकमंत्री पद देण्यात आलेलं नाही. त्यामुळे धनंजय मुंडे यांना वाल्मिक कराड खंडणी प्रकरण आणि संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरण भोवलं का? असा सवाल आता राजकीय वर्तुळातून उपस्थित केला जात आहे. अजित पवार यांच्याकडे बीड जिल्ह्याचं पालकमंत्रिपद देण्यात आल्यानंतर धनंजय मुंडेंनी ट्वीट करत प्रतिक्रिया दिली आहे. "बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन व खूप खूप स्वागत. आदरणीय दादांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्याच्या विकासाला पुणे जिल्ह्याप्रमाणे अधिकची गती आणि चालना मिळेल असा मला विश्वास आहे. बीड जिल्ह्यातील सध्या बदललेली राजकीय व सामाजिक स्थिती पाहता मुख्यमंत्री महोदय व उपमुख्यमंत्री महोदय यांना मी स्वतः बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद अजित पवार यांना स्वीकारण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार त्यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वीकारले, याचा मला आनंद वाटतो. सद्यस्थितीत मला कोणत्याच जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी नको, अशी माझी विनंतीही मान्य केल्याबद्दल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री महोदयांचे आभार! मला दिलेल्या विभागाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहील, अशी प्रतिक्रिया धनंजय मुंडे यांनी ट्वीट करत दिली आहे.

### मुंडेंची पहिली प्रतिक्रिया काय?

पालकमंत्री पदाची यादी आज (१८ जानेवारी) जाहीर करण्यात आली. या यादीतून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा मंत्री धनंजय मुंडे यांना वगळण्यात आलं आहे. बीड जिल्ह्याचं पालकमंत्रिपद अजित पवार यांच्याकडे देण्यात आलं आहे. धनंजय मुंडे यांना बीड जिल्ह्याचंच नाही तर इतर दुसऱ्या कोणत्याही जिल्ह्याचं पालकमंत्रिपद देण्यात आलेलं नाही. त्यामुळे हा त्यांच्यासाठी धक्का असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. तसेच धनंजय मुंडे यांना वाल्मिक कराड खंडणी प्रकरण आणि संतोष देशमुख हत्या प्रकरण भोवलं का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद धनंजय मुंडे यांच्याकडे देण्यात येऊ नये, अशी मागणी बीडमधील सर्वपक्षीय आमदार आणि स्थानिक नेत्यांनी केली होती. अजित पवार यांनी स्वत:कडे घ्यावं, अशी मागणी केली होती. यानंतर अखेर आता बीडचं पालकमंत्री पद अजित पवार यांच्याकडे देण्यात आलं आहे. बीड जिल्ह्याचं पालकमंत्रिपद अजित पवार यांच्याकडे देण्यात आल्यानंतर मंत्री धनंजय मुंडे यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट करत पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

---

# उत्तम जानकर आमदारकीचा राजीनामा देणार

## माळशिरसचे आमदार जानकर ईव्हीएमच्या मुद्द्यावरून आक्रमक

। कोल्हापूर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी विधानसभेच्या निवडणुकीनंतर ईव्हीएमचा मुद्दा अनेकदा उपस्थित केला. तसेच यावरून उत्तम जानकर यांनी आंदोलनाचाही इशारा दिला होता. तसेच बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणीही त्यांनी केली होती. यानंतर आता उत्तम जानकर ईव्हीएमच्या मुद्द्यावरून आक्रमक झाले आहेत.**



आता आमदार उत्तम जानकर यांनी मोठा निर्णय घेणार असल्याचं जाहीर केलं आहे. "२३ जानेवारी रोजी आपण आमदारकीचा राजीनामा दिल्लीत निवडणूक आयोगाकडे देणार आहे", असं उत्तम जानकर यांनी म्हटलं आहे. तसेच माळशिरस मतदारसंघात बॅलेट पेपरवर पोटनिवडणूक घेण्यात यावी अन्यथा आम्ही दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन करणार असल्याचंही जानकर यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आता ईव्हीएमचा मुद्दा पुन्हा तापण्याची शक्यता आहे."ईव्हीएमच्या मुद्याला मारकडवाडीत गावातून सुरुवात झाली आणि तोच आक्रोश संपूर्ण माळशिरस तालुक्यात आहे. आता माळशिरस तालुक्यातील धानोरे या गावात देखील ग्रामसभेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्या ठिकाणी १२०६ लोकांनी हात वरती करून मतदान केलं. पण त्या गावात मला ९६३ एवढेच मते दाखवण्यात आलेली आहेत. आता धानोरे गावातील १२०० लोकांनी प्रतिज्ञापत्र दिले आहेत आणि धानोरे गावातील मतदानाची पडताळणी करण्याची मागणी केली आहे. आता जर निवडणूक आयोग मतदानाची पडताळणी करणार नसेल तर २३ जानेवारी रोजी मी आमदारकीचा राजीनामा देणार आहे"ते टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहीनीशी बोलत होते."आमदारकीचा राजीनामा दिल्यानंतर २५ जानेवारी रोजी दिल्लीतील जंतरमंतरवर मी (उत्तम जानकर) आणि बच्चू कडू आम्ही आंदोलन करणार आहोत.

### शरद पवारांची भूमिका काय?

तसेच माझ्या मतदारसंघाची पोटनिवडणूक बॅलेट पेपरवर घ्यावी अशी आमची मागणी आहे. मात्र, जर निवडणूक आयोगाने बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी मान्य केली नाही तर आम्ही दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन करणार आहोत. दिल्लीत देखील अशाच प्रकारचा ईव्हीएमचा विषय सुरु आहे. त्यामुळे आमच्याबरोबर राहुल गांधी आणि अरविंद केजरीवाल हे देखील सहभागी होतील", असंही आमदार उत्तम जानकर यांनी म्हटलं आहे.धानोरे गावातील १२०० लोकांनी प्रतिज्ञापत्र निवडणूक आयोगाच्या नावाने दिलेलं आहे. तसेच मारकडवाडीच्या १४६६ लोकांनी प्रतिज्ञापत्र दिलेलं आहे. हे प्रतिज्ञापत्र आम्ही निवडणूक आयोगाकडे सादर करणार आहोत. त्यानंतर आंदोलन करणार आहोत.

# न्यायालयाने संजय रॉयला ठरवलं दोषी!

## कोलकाता प्रकरण: पीडितेच्या वडिलांना अश्रू अनावर

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कोलकाता येथील आरजी.कर महाविद्यालय आणि रुग्णालयातील एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून हत्या केल्याप्रकरणी मुख्य आरोपी संजय रॉयला सियालदह सत्र न्यायालयाने आज दोषी ठरवलं. आता संजय रॉयला सोमवारी शिक्षा ठोठावली जाणार आहे. कोलकात्यात घडलेल्या या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण देशातून संतापाची लाट उसळली होती. या घटनेनंतर सुमारे सहा महिन्यांनी मुख्य आरोपी संजय रॉयला गुन्ह्यात दोषी ठरवण्यात आलं आहे. आता २० जानेवारी रोजी संजय रॉयला न्यायालय शिक्षा ठोठावणार आहे.**




याकडे अनेकांचं लक्ष लागलं आहे. दरम्यान, आरजी.कर रुग्णालयातील एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून हत्या केल्याच्या प्रकरणात मुख्य आरोपी संजय रॉय याला दोषी ठरवल्यानंतर संजय रॉयने आपण निर्दोष असल्याचं म्हटलं आहे. मला या प्रकरणात गोवण्यात आलं आहे. मात्र, मी निर्दोष आहे, या प्रकरणात एका आयपीएस अधिकाऱ्याचा हात आहे, असा आरोप आरोपी संजय रॉयने केला आहे. यासंदर्भातील वृत्त एएनआयच्या हवाल्याने हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. आरोपी संजय रॉयने म्हटलं की, मी असं काहीही केलेलं नाही. मला यात गोवण्यात आलं. मात्र, ज्यांनी हे कृत्य केलं त्यांना सोडून दिलं जात आहे. यामध्ये एका आयपीएस अधिकाऱ्याचा समावेश आहे. मी नेहमी गळ्यात रुद्राक्षाची माळ घालतो. मी गुन्हा केला असता तर घटनास्थळी माझ्या गळ्यातील माळ तुटली असती. मी हा गुन्हा करू शकत नाही, असं संजय रॉयने म्हटलं आहे. दरम्यान, आज सियालदह सत्र न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवल्यानंतर आरोपी संजय रॉयची कोठडीत रवानगी करण्यात आली. आता सोमवारी शिक्षा सुनावण्यात येणार आहे. तसेच या खटल्याच्या सुनावणीसाठी दुपारी १२.३० वाजताची वेळ निश्चित करण्यात आलेली आहे.कोलकाता येथील आर.जी.कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात ९ ऑगस्ट रोजी सकाळी एक महिला डॉक्टर सेमिनार हॉलमध्ये मृतावस्थेत आढळली होती. त्यावेळी तिचा मृतदेह अर्धनग्न अवस्थेत आढळून आला होता. तिच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर तिच्यावर बलात्कार झाल्याचे समोर आले होते. तिच्या शरीरावर आणि गुप्तांगावर अनेक जखमा होत्या. आरोपीने या डॉक्टरवर आधी बलात्कार केला आणि त्यानंतर अत्यंत क्रूरपणे तिची हत्या केली. तसेच मृतदेहाची विटंबना केली होती. हे प्रकरण समोर आल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली होती.सियालदाह जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश अनिर्बान दास यांनी या प्रकरणी निकाल दिला तेव्हा पीडितेच्या वडिलांनी त्यांना म्हटले की, "मी तुमच्यावर दाखवलेल्या विश्वासाला तुम्ही योग्य न्याय दिला आहे." दरम्यान कोलकात्यातील आर जी कर रुग्णालयात ही घटना घडल्यानंतर देशभरात खळबळ उडाली होती. या घटनेचा देशभरातून मोठ्या प्रमाणात निषेध करण्यात आला होता. कोलकाता पोलिसांचा स्वंयसेवक म्हणून काम करणाऱ्या संजय रॉयने गुन्हा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी ९ ऑगस्ट २०२४ रोजी त्याला अटक करण्यात आली होती. दरम्यान, आरजी.कर रुग्णालयातील एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून हत्या केल्याच्या प्रकरणात मुख्य आरोपी संजय रॉय याला दोषी ठरवल्यानंतर संजय रॉयने आपण निर्दोष असल्याचं म्हटलं आहे. मला या प्रकरणात गोवण्यात आलं आहे. मात्र, मी निर्दोष आहे, या प्रकरणात एका आयपीएस अधिकाऱ्याचा हात आहे, असा आरोप आरोपी संजय रॉयने केला आहे.

### काय आहे नेमकं प्रकरण?

कोलकाता येथील आरजी.कर महाविद्यालय आणि रुग्णालयातील एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून हत्या केल्याप्रकरणी मुख्य आरोपी संजय रॉयला सियालदह सत्र न्यायालयाने आज दोषी ठरवलं. यासंदर्भातील वृत्त एएनआयच्या हवाल्याने हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. आरोपी संजय रॉयने म्हटलं की, मी असं काहीही केलेलं नाही. मला यात गोवण्यात आलं. मात्र, ज्यांनी हे कृत्य केलं त्यांना सोडून दिलं जात आहे. यामध्ये एका आयपीएस अधिकाऱ्याचा समावेश आहे. मी नेहमी गळ्यात रुद्राक्षाची माळ घालतो. मी गुन्हा केला असता तर घटनास्थळी माझ्या गळ्यातील माळ तुटली असती. मी हा गुन्हा करू शकत नाही, असं संजय रॉयने म्हटलं आहे. कोलकात्यातील आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातल्या ९ ऑगस्ट रोजी सकाळी एक महिला डॉक्टर सेमिनार हॉलमध्ये मृतावस्थेत आढळली होती. त्यावेळी तिचा मृतदेह अर्धनग्न अवस्थेत होता. तिच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर तिच्यावर बलात्कार झाल्याचे समोर आले. तिच्या शरीरावर आणि गुप्तांगावर अनेक जखमा होत्या. तेव्हा तिच्या डोळ्यांमधूनही रक्त वाहात होते.

---

# अरविंद केजरीवाल यांच्या गाडीवर हल्ला

## दिल्ली निवडणुकीत पराभवाच्या भीतीने भाजपा घाबरली : आप

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. आम आदमी पक्ष आणि भारतीय जनता पक्षात आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण तापलं आहे. यातच आज (१८ जानेवारी) दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आल्याचा आरोप आम आदमी पक्षाकडून करण्यात आला आहे.**

नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघात अरविंद केजरीवाल हे प्रचारासाठी गेले होते. मात्र, त्या ठिकाणी केजरीवाल यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आल्याचा आरोप आम आदमी पक्षाने केला आहे.अरविंद केजरीवाल यांना काळे झेंडेही दाखवण्यात आले असून तसेच अरविंद केजरीवाल यांच्या गाडीवर दगडफेक करणारे भाजपाचे उमेदवार प्रवेश वर्मा यांचे समर्थक असल्याचा आरोप 'आप'कडून करण्यात आला आहे. याबाबतचा एक व्हिडीओही 'आप'ने एक्सवर शेअर केला आहे, तर आम आदमी पक्षाने केलेले आरोप प्रवेश वर्मा यांनी खोटे असल्याचं म्हटलं आहे. तसेच अरविंद केजरीवाल




यांच्याच गाडीने भाजपाच्या दोन समर्थकाला धडक दिल्याचा आरोप प्रवेश वर्मा यांनी केला आहे. दरम्यान, या आरोप-प्रत्यारोपामुळे दिल्लीत सध्या राजकारण चांगलंच तापलं आहे. आम आदमी पक्षाने अधिकृत एक्स (ट्विटर) या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर करत म्हटलं आहे की, "दिल्ली निवडणुकीत पराभवाच्या भीतीने भाजपा घाबरला आहे. त्यामुळे अरविंद केजरीवाल यांच्यावर हल्ला करण्यात आला. अरविंद केजरीवाल हे प्रचार करत असताना भाजपाचे प्रवेश वर्मा यांच्या गुंडांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर विटा आणि दगडांनी हल्ला केला, तसेच अरविंद केजरीवाल यांनी प्रचार करू नये, म्हणून त्यांना जखमी करण्याचा प्रयत्न केला. पण भाजपाच्या लोकांनो, केजरीवाल अशा भ्याड हल्ल्याला घाबरत नाहीत, दिल्लीची जनता तुम्हाला चोख प्रत्युत्तर देईल.

### प्रवेश वर्मा यांनी काय आरोप केला?

आम आदमी पक्षाने केलेल्या आरोपाला उत्तर देताना भाजपाचे नेते प्रवेश वर्मा यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावरच आरोप केला आहे. प्रवेश वर्मा यांनी म्हटलं आहे की, "अरविंद केजरीवाल यांच्या गाडीने भाजपाच्या दोन समर्थकांना धडक दिली. त्यामध्ये एका कार्यकर्त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. यानंतर त्या दोन कार्यकर्त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मात्र, निवडणुकीतील पराभव पाहून अरविंद केजरीवाल हे लोकांच्या जीवाचे मोल विसरले आहेत.

# सैफवरील हल्ल्यावर मकरंदची प्रतिक्रिया



सैफ अली खानवर हल्ला झाल्यानंतर अनेकांनी या हल्ल्याविरोधी प्रतिक्रिया दिल्या. हल्लेखोराला शोधण्यासाठी पोलीस जंगजंग पछाडत आहेत. तर, करीना कपूरनेही जबाबात हल्लेखोर अत्यंत आक्रमक दिसत असल्याचं सांगितलं. त्याने घरातील कोणतीही वस्तू चोरली नाही. त्यामुळे तो नेमका कशाच्या उद्देशाने घरात शिरला होता, याबाबत पोलिसांना अद्याप माहिती मिळाली नाही. दरम्यान, या प्रकरणावर मराठी अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी अत्यंत बोलकी प्रतिक्रिया दिली आहे. ते बारामती येथील कृषक प्रदर्शनात गेले असता एबीपी माझाने त्यांच्याशी संवाद साधला. सैफवरील हल्ल्याप्रकरणी मकरंद अनासपुरे यांना विचारलं असता ते म्हणाले, अभिनेत्यांवरच काय तर कोणावरही हल्ला झाला, कोणालाही निर्घृणपणे मारलं तरी ती निषेधार्ह बाब आहे. जे दोषी आहेत, त्यांना कडक शासन झाले पाहिजे, अन्यथा कायद्याचा धाक उरणार नाही."महाराष्ट्राचं वातावरण तुम्हाला कसं वाटतं? असंही यावेळी त्यांना विचारण्यात आलं. त्यावर मकरंद अनासपुरे म्हणाले, सध्याचं महाराष्ट्राचं वातावरण सकारात्मककडे जावं असं वाटतं. आपला देश स्वच्छ व्हावा असं वाटत असेल तर आधी आपल्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावा लागतो, आजूबाजूची माणसं सकारात्मकतेने विचार करणारी ठेवावी लागतात. जातीपातीचं विष समाजात पसरलं तर सर्वांसाठीच अत्यंत दुर्दैवी असणार आहे. त्यामुळे आपण सकारात्मक होऊया हे जास्त महत्त्वाचं आहे."

# मराठी अभिनेत्रीची लगीनघाई!




मराठी अभिनयविश्वात लगीनघाई सुरू आहे. रेश्मा शिंदे, किरण गायकवाड व वैष्णवी कल्याणकर, श्रद्धा रानडे, शाल्व किंजवडेकर आणि आता शिवानी सोनारपाठोपाठ आणखी एक मराठी अभिनेत्री लग्नबंधनात अडकणार आहे. साखरपुडा केल्यानंतर जवळपास वर्षभराने लग्न करणार आहे. सध्या तिच्या बॅचलर पार्टीचे फोटो चर्चेत आहेत. 'बलोच' या मराठी चित्रपटात झळकलेली अभिनेत्री तेजश्री जाधव लवकरच लग्न करणार आहे. तिने इन्स्टाग्रामवर तिच्या बॅचलर पार्टीचे काही फोटो पोस्ट केले आहेत. यात तेजश्रीबरोबर तिचे मित्र-मैत्रिणी दिसत आहेत. तेजश्रीने तिच्या बॅचलर पार्टीमध्ये एक छान शॉर्ट वनपीस घातला होता. तिने केक हातात घेऊन काढलेले काही फोटो पोस्ट केले आहेत.दरम्यान, तेजश्रीने १४ मार्च २०२४ रोजी साखरपुडा उरकला होता. तिच्या होणाऱ्या पतीचे नाव रोहन सिंह आहे. रोहनने तिला साखरपुड्याच्या काही दिवसांआधी समुद्रकिनारी प्रपोज केलं होतं. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने त्यांनी साखरपुडा केला. आता तिने तिच्या बॅचलर पार्टीचे फोटो पोस्ट केले आहेत. तेजश्री व रोहन लवकरच लग्नबंधनात अडकणार आहेत. तेजश्रीने अद्याप तिच्या लग्नाची तारीख जाहीर केलेली नाही.तेजश्री दाक्षिणात्य चित्रपटात आपल्या अभिनयाची छाप उमटवणारी मराठी मुलगी म्हणून ओळखली जाते. तेजश्रीने २०१६ मध्ये अभिनेत्री सोनाक्षी सिन्हाची मुख्य भूमिका असलेल्या 'अकिरा' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. त्यानंतर ती 'अट्टी' या तामिळ चित्रपटात झळकली होती. यानंतर ती 'माधुरी टॉकीज', 'द जोकर : अ स्ट्रेंज किडनॅपर' या हिंदी वेब सीरिजमधून प्रेक्षकांच्या भेटीला आली.

# तेजश्री अपूर्वाच्या मैत्रीत दुरावा

'स्टार प्रवाह' वाहिनीवरील 'प्रेमाची गोष्ट' मालिका सध्या एका कारणामुळे खूप चर्चेत आली आहे, ते म्हणजे तेजश्री प्रधान. 'प्रेमाची गोष्ट' मालिकेत तेजश्री प्रधानने मुक्ता ही भूमिका साकारली होती. पण काही दिवसांपूर्वी तेजश्रीने मालिका सोडल्याची धक्कादायक माहिती समोर आली. त्यामुळे प्रेक्षकांमध्ये नाराजीचे सूर पसरले आहेत. तेजश्रीच्या अचानक एक्झिटमुळे अनेक प्रश्नदेखील उपस्थित झाले आहेत. पण, याबाबत तेजश्रीने अद्याप मौन धारण केल्याचं पाहायला मिळत आहे.'प्रेमाची गोष्ट' मालिकेत तेजश्री प्रधानची जागा अभिनेत्री स्वरदा ठिगळेने घेतली आहे. स्वरदा आता मुक्ताच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. 'प्रेमाची गोष्ट'मधील सावनी म्हणजे अभिनेत्री अपूर्वा नेमळेकरने स्वरदासाठी खास पोस्ट शेअर केली होती. शिवाय यानिमित्ताने दोघी सेलिब्रेशनदेखील करताना दिसल्या.

# पण मी खूश नाही



'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे मराठमोळी निक्की तांबोळी घराघरांत पोहोचली. निक्कीने काही दाक्षिणात्य चित्रपटही केले आहेत. आता ती 'सेलिब्रिटी मास्टरशेफ'मधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या शोचा एक प्रोमो व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये निक्की ढसाढसा रडताना दिसत आहे, त्यामुळे निक्कीला नेमकं झालंय तरी काय? असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. सोनी टीव्हीच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवरून 'सेलिब्रिटी मास्टरशेफ'चा एक प्रोमो शेअर करण्यात आला आहे, ज्यामध्ये ती रडताना दिसते. "मागील तीन वर्षांत मी हिट रिॲलिटी शो दिले आहेत, पण तरीही मी खूश नाहीये. मी आनंद शोधतेय," असं निक्की रडत रडत म्हणते. यावेळी ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी यांच्या डोळ्यांतही पाणी येतं. त्यानंतर शेफ रणवीर ब्रार व फराह खान निक्कीशी बोलताना दिसतात. निक्कीला ती काय बनवतेय, असं ते विचारतात. त्याचं निक्की उत्तर देते. यावेळी निक्की गोंधळलेली दिसते. चिप्स कुठे आहेत, असं रणवीर तिला विचारतात. त्यावर ती बनवू शकली नाही असं उत्तर देते. हे ऐकून फराह खान व विकास खन्ना यांना धक्का बसतो.पुढे निक्की रडत म्हणते, "मी खूप मेहनत करतेय, मला शो मिळत आहेत, पण मी खूश नाहीये. कधी कधी मला वाटतं की मी या सगळ्या गोष्टींसाठी पात्र नाही." निक्कीचं बोलणं संपल्यावर हा प्रोमो संपतो. निक्की नेमकी कशामुळे रडते, काय घडलंय, ते एपिसोड प्रसारित झाल्यावरच कळेल.निकी तांबोळीच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास तिने मॉडेल म्हणून करिअरची सुरुवात केली होती. २०१९ मध्ये, तिने 'चिकाती गडिलो चिथाकोटुडू' या तेलुगू हॉरर कॉमेडी चित्रपटातून अभिनयात पदार्पण केलं होतं.

# गायक दर्शन रावलने बेस्ट फ्रेंडशी बांधली लग्नगाठ



'लव्हयात्री' मधील चोगाडा' आणि 'इश्क विश्क रिबाउंड' मधील 'सोनी सोनी' सारख्या गाण्यांचा गायक दर्शन रावल लग्नबंधनात अडकला आहे. त्याने इन्स्टाग्रामवर त्याच्या लग्नातील काही सुंदर फोटो शेअर करून चाहत्यांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. दर्शनने त्याची बेस्ट फ्रेंड धरल सुरेलिया हिच्याशी एका खासगी सोहळ्यात लग्नगाठ बांधली. दर्शन रावलने इन्स्टाग्रामवर 'माय बेस्ट फ्रेंड फॉरेव्हर' असं कॅप्शन देत लग्नाचे फोटो शेअर केले आहेत. सर्व फोटोंमध्ये दर्शन व धरल दोघेही हसत लग्नाच्या विधी करताना दिसत आहेत. दर्शन रावलने लग्नात आयवही रंगाची शेरवानी घातली होती, तर त्याच्या पत्नीने, धरलने पारंपरिक लाल लेहेंगा निवडला होता. या कपड्यांबरोबर मॅचिंग दागिने घालून तिने तिचा लूक पूर्ण केला होता. पारंपरिक पद्धतीने दोघांचं लग्न झालं. लग्नात दोघेही खूप सुंदर दिसत आहेत.दर्शनने लग्नाचे फोटो पोस्ट केल्यावर चाहते व त्याचे मित्र-मैत्रिणी कमेंट्स करत आहेत. सर्वजण दर्शन व धरलचं आयुष्यातील नवीन प्रवासासाठी अभिनंदन करत आहेत. तसेच लग्नात दोघेही सुंदर दिसत असल्याच्या कमेंट्स अनेकांनी केल्या आहेत.दर्शन रावल तरुणाईत खूप लोकप्रिय आहे. ११ वर्षांपूर्वी २०१४ मध्ये 'इंडियाज रॉ स्टार'च्या पहिल्या सीझनमध्ये दर्शन रावल स्पर्धक म्हणून सहभागी झाला होता. तो हा शो जिंकू शकला नव्हता. पहिल्या पर्वाचा विजेता ओडिशाचा ऋतुराज मोहंती ठरला होता. ऋतुराजकडून हरलेल्या दर्शनची या शोमध्ये गायलेली गाणी खूप गाजली होती. त्या शोमुळे त्याचा मोठा चाहतावर्ग तयार झाला.या शोने दर्शनला एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आणि त्याने बॉलीवूडमध्ये पार्श्वगायक म्हणून आपल्या करिअरची सुरुवात केली. २०१५ मध्ये त्याने हिमेश रेशमियाचे आभार, जो शोचा जज होता.

# 23 वर्षीय खेळाडूचे चमकले नशीब!

## यशस्वी जैस्वालची चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी इंडियात निवड

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी आणि इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी भारतीय संघात युवा आणि अनुभवी खेळाडूंना संधी मिळाली आहे. तसेच उपकर्णधारपदाची जबाबदारी शुबमन गिलकडे सोपवण्यात आली आहे. विशेष म्हणजे या वनडे संघात पहिल्यांदाच यशस्वी जैस्वाल संधी देण्यात आली आहे.**




यशस्वी जैस्वालची भारताच्या एकदिवसीय संघात पहिल्यांदाच निवड झाली आहे. अशा परिस्थितीत यशस्वी जैस्वाल चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची शक्यता आहे. यशस्वीने आतापर्यंत करिअरमध्ये केवळ कसोटी आणि टी-२० सामने खेळले आहेत. त्याची निवड करण्याबाबत कर्णधार रोहित शर्माने प्रतिक्रिया दिली आहे.रोहित शर्मा म्हणाला,“गेल्या ६-८ महिन्यांत त्याने जी काही कामगिरी केलीय त्याच्या आधारे आम्ही त्याची निवड केली आहे. तो आतापर्यंत एकदिवसीय खेळला नाही, पण आम्ही त्याची निवड केली आहे. त्याने क्षमता दाखवली आहे. कधीकधी आपल्याला हे करण्याची आवश्यकता असते. प्रत्येकाबद्दल बोलायचे तर आपण सर्वांना संतुष्ट करू शकत नाही. होय, हा एक कठीण निर्णय आहे, परंतु आम्हाला तो घेणे आवश्यक आहे.”यशस्वी जैस्वालच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील कामगिरीबद्दल सांगायचे तर, तो आतापर्यंत १९ कसोटी खेळला आहे. या कालावधीत त्याने ३६ डावांमध्ये ५२.८८ च्या सरासरीने आणि ६५.६६ च्या स्ट्राईक रेटने १७९८ धावा केल्या आहेत. यशस्वीच्या नावावर कसोटीत १० अर्धशतके आणि ४ शतके आहेत. या फॉरमॅटमध्ये त्याची सर्वोच्च धावसंख्या नाबाद २१४ आहे. त्याचबरोबर २३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या २२ डावात ७२३ धावा केल्या आहेत. या फॉरमॅटमध्ये ५ अर्धशतकांसह त्याने एक शतक झळकावले आहे.रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. श्रेयस अय्यर आणि मोहम्मद शमीसारखे खेळाडू संघात परतले आहेत. मात्र, संजू सॅमसनला या संघातून वगळण्यात आले आहे, ज्याने जवळपास ५७च्या सरासरीने दमदार कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे मागील पाच सामन्यात त्याने तीन शतकं झळकावली होती. काही दिवसांपासून आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी संघात चर्चेत असलेल्या खेळाडूंच्या यादीत संजू सॅमसनच्या नावाचाही समावेश होता, मात्र दुर्दैवाने त्याला संघात स्थान मिळाले नाही. विजय हजारे ट्रॉफीमध्ये न खेळल्यामुळे त्याला शिक्षा झाल्याचा दावा अनेक बातम्यांमध्ये केला जात आहे. आणखी एक पैलू म्हणजे ऋषभ पंत संघाचा मुख्य यष्टिरक्षक आणि केएल राहुलला बॅकअप खेळाडू म्हणून संधी मिळाल्याने संजूवर अन्याय झाल्याची चर्चा आहे.संजू सॅमसनने आतापर्यंत खेळलेल्या १६ एकदिवसीय सामन्यांच्या १४ डावांमध्ये ५६.६६ च्या सरासरीने आणि ९९.६० च्या स्ट्राईक रेटने ५१० धावा केल्या आहेत. या काळात त्याने ३ अर्धशतके आणि एक शतक झळकावले आहे. संजू सॅमसनने दक्षिण आफ्रिकेतील टी-२० मालिकेत भारतासाठी शतक झळकावले होते. विशेष म्हणजे त्याने टीम इंडियासाठी मागील ५ टी-२० सामन्यात ३ शतकं झळकावली आहेत.

### यशस्वी 19 कसोटी खेळला

यशस्वी जैस्वालची भारताच्या एकदिवसीय संघात पहिल्यांदाच निवड झाली आहे. अशा परिस्थितीत यशस्वी जैस्वाल चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची शक्यता आहे. यशस्वीने आतापर्यंत करिअरमध्ये केवळ कसोटी आणि टी-२० सामने खेळले आहेत. त्याची निवड करण्यबाबत कर्णधार रोहित शर्माने प्रतिक्रिया दिली आहे.रोहित शर्मा म्हणाला, “गेल्या ६-८ महिन्यांत त्याने जी काही कामगिरी केलीय त्याच्या आधारे आम्ही त्याची निवड केली आहे. तो आतापर्यंत एकदिवसीय खेळला नाही, पण आम्ही त्याची निवड केली आहे. त्याने क्षमता दाखवली आहे. कधीकधी आपल्याला हे करण्याची आवश्यकता असते. प्रत्येकाबद्दल बोलायचे तर आपण सर्वांना संतुष्ट करू शकत नाही. होय, हा एक कठीण निर्णय आहे, परंतु आम्हाला तो घेणे आवश्यक आहे.”यशस्वी जैस्वालच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील कामगिरीबद्दल सांगायचे तर, तो आतापर्यंत १९ कसोटी खेळला आहे.

# मोहम्मद सिराजला टीम इंडियातून डच्चू!

## रोहित शर्माने सांगितलं सिराजची निवड न होण्यामागचं कारण

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बीसीसीआयने चॅम्पियन्स ट्रॉफी आणि इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी भारताचा १५ सदस्यी संघ जाहीर केला. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद संघाला या संघातून डच्चू देण्यात आला आहे. यापूर्वी इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली होती आणि त्यातही सिराजचे नाव नव्हते. मोहम्मद सिराज भारतीय संघातून पत्ता का कट करण्यात आला आहे? जाणून घेऊया.**



भारतीय भूमीवर २०२३ मध्ये खेळल्या गेलेल्या वनडे वर्ल्ड कपमध्ये सिराज टीम इंडियाचा भाग होता. याशिवाय जून २०२४ मध्ये झालेल्या टी-२० विश्वचषकातही सिराज टीम इंडियाचा भाग होता, पण चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडियामध्ये त्याचा समावेश करण्यात आला नसल्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. यावर आता कर्णधार रोहित शर्माने प्रतिक्रिया दिली आहे.रोहित शर्मान मोहम्मद सिराजबाबत म्हणाला की ,”बुमराह खेळेल की नाही याबद्दल आम्हाला खात्री नव्हती. त्यामुळे, आम्हाला वाटले की आम्हाला नवीन चेंडूने आणि बॅकएंडवर गोलंदाजी करू शकेल अशा व्यक्तीची गरज आहे. म्हणून आम्ही बॅकएंडवर गोलंदाजी करण्यासाठी अर्शदीपची निवड केली. शमी, आपण सर्वांनी पाहिले की तो काय आहे आणि नवीन चेंडूसह काय करू शकतो. त्यामुळे आता शमी परतला आहे आणि नवीन चेंडूच्या अनुपस्थितीत सिराजचा प्रभाव थोडा कमी होतो. आम्ही फक्त तीन वेगवान गोलंदाज घेतले आहेत. कारण आम्ही अनेक अष्टपैलूंना संधी दिली आहे.”रोहित शर्मा पुढे म्हणाला, “त्याला संघातून बाहेर पडावे लागले हे दुर्दैव आहे. पण विशिष्ट भूमिका बजावू शकतील असे खेळाडू आणण्यासाठी आमच्याकडे पर्याय नव्हता. मला वैयक्तिकरित्या असे वाटते की आमच्याकडे असे खेळाडू आहेत.

### रोहित शर्मा काय म्हणाला?

जे नवीन चेंडूने चांगली कामगिरी करु शकतात. मधल्या फळीत गोलंदाजी करू शकतात आणि बॅकएंडवर गोलंदाजी करू शकतात. याशिवाय जून २०२४ मध्ये झालेल्या टी-२० विश्वचषकातही सिराज टीम इंडियाचा भाग होता, पण चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडियामध्ये त्याचा समावेश करण्यात आला नसल्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. यावर आता कर्णधार रोहित शर्माने प्रतिक्रिया दिली आहे.रोहित शर्मान मोहम्मद सिराजबाबत म्हणाला की ,”बुमराह खेळेल की नाही याबद्दल आम्हाला खात्री नव्हती.

# चेंबरच्या तुटक्या झाकणाने छोटे-मोठे अपघात

## वर्दळीच्या रस्त्यावरून रात्रीदेखील होते वाहतूक

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



पुणे-नाशिक महामार्गावरील मोशी मुख्य चौकाकडून भारतमाता चौकाकडे येणाऱ्या रस्त्यालगत पूर्वीच्या पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेसमोरील चेंबरचे झाकण अनेक महिन्यांपासून तुटलेल्या अवस्थेत आहे. त्यात पाय अडकून लहान मुले, महिला, वयोवृद्ध व्यक्तींसह वाहनांची चाके अडकून छोटे-मोठे अपघात होत आहेत. त्यामुळे, या झाकणाची दुरुस्ती लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांसह वाहन चालकांकडून करण्यात येत आहे. पुणे-नाशिक महामार्ग नेहमीच वर्दळीसह भरधाव वाहतुकीचा आहे. या रस्त्यावरुन रात्री देखील वाहतूक चालूच असते. असंख्य नागरिक ये-जा करत असतात. पथदिवे बंद असल्यास तेथील चेंबरचे तुटके झाकण दिसत नाही. त्यामुळे अनेक वेळा अपघाताच्या घटना घडत आहेत. या रस्त्यावरुन प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी देखील ये-जा करत असतात. परंतु, कुणाचेही लक्ष चेंबरच्या तुटलेल्या झाकणाकडे जात नाही. हे झाकण महापालिका बदलू शकत नाही का ? असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. समस्येची गंभीरता लक्षात घेऊन चेंबरचे झाकण बदलण्याचे काम त्वरित करण्यात यायला हवे होते. परंतु महापालिका जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही नागरिकांतून करण्यात येत आहे. सध्या येथे पुन्हा अपघात घडू नये म्हणून येथे दगड लावून तात्पुरते संरक्षण उभारले आहे.

> “ आम्ही दररोज येथून ये-जा करतो. मागील चार महिन्यांपासून चेंबरचे झाकण तुटलेल्या अवस्थेत आहे. प्रशासनास कळवूनही डोळे झाक करतात की काय ? आमच्यासमोर या तुटक्या झाकणात वाहनांची चाके अडकून वाहनचालक पडून अपघाताच्या घटना घडल्या आहेत.”
>
> **-डॉ. सोमनाथ घोडेकर,** स्थानिक रहिवासी, मोशी

> “ चेंबरचे झाकण बदलून तिथे नवीन झाकण प्रशासन कधी बसविणार आहे? लवकरात लवकर त्याची दुरुस्ती व्हायला हवी. या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यांचे पाय अडकून अपघात होत आहेत.”
>
> **-नलिनी पाटील,** ज्येष्ठ नागरिक, मोशी

> “ चेंबरचे झाकण लवकर बसविण्यात येईल. त्या प्रकारच्या सूचना संबंधित कनिष्ठ अभियंत्यांना देण्यात आल्या आहेत.
>
> **-लक्ष्मीकांत कोल्हे,** वरिष्ठ अभियंता (स्थापत्य)




# पिंपरी-चिंचवडची ‘कचरा कोंडी’!

## देशातील मिथेन वायू उत्सर्जनाचे 22 ‘हॉटस्पॉट’

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नोटिशीमुळे महापालिका अडचणीत भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) केलेल्या अभ्यासात देशातील मिथेन वायू उत्सर्जनाचे २२ ‘हॉटस्पॉट’ समोर आले होते. भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) केलेल्या अभ्यासात देशातील मिथेन वायू उत्सर्जनाचे २२ ‘हॉटस्पॉट’ समोर आले होते. त्यात पिंपरी-चिंचवडमधील मोशीतील कचरा डेपोचाही समावेश होता. त्यानंतर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (एनजीटी) याबाबत उपाययोजनांचे निर्देश देऊनही त्याचे पालन न केल्याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पिंपरी-चिंचवड महापालिकेला नोटीस बजावली आहे. इस्रोच्या अभ्यासानंतर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने मिथेन वायू उत्सर्जन मोठ्या प्रमाणात होणाऱ्या ठिकाणी उपाययोजना करण्यासाठी समिती नेमली होती. या समितीने मिथेन वायू उत्सर्जन थांबविण्यासाठी अनेक उपाययोजना सुचविल्या होत्या. या उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र



प्रदूषण नियंत्रण मंडळाने महापालिकेला विचारणा केली होती. त्यावर महापालिकेने उत्तर दिले होते परंतु, ते मंडळाला समाधानकारक वाटले नाही. त्यामुळे मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कचरा डेपोला भेट देऊन तपासणी केली. त्यानंतर मंडळाने महापालिकेला गुरुवारी नोटीस बजावली. मंडळाने नोटिशीत म्हटले आहे की, करोना काळात टाकण्यात आलेल्या कचऱ्याचे बायोमायनिंग होत नसल्याचे तपासणीत आढळून आले. याचबरोबर जळालेले तेल तिथे मोठ्या प्रमाणात टाकण्यात आले आहे.



# पिंपरीतील ४३ मालमत्तांचा लिलाव!

## मालमत्तांचे मूल्य 221 कोटी रुपये, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक, सराफा व्यापाऱ्यांच्या मालमत्तांचा समावेश

**| पिंपरी-चिंचवड |**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**



महापालिकेने एक लाखापुढील थकबाकीदारांच्या निवासी आणि बिगर निवासी अशा जप्त केलेल्या ४३ मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया सुरू केली आहे. यामध्ये प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक, सराफा व्यापाऱ्यांच्या मालमत्तांचा समावेश आहे. चालू बाजारभावानुसार या मालमत्तांची किंमत २२१ कोटी ५३ लाख चार हजार ६०३ रुपये आहे. लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुकांना ३० जानेवारी २०२५ पर्यंत अर्ज करता येणार आहेत. तर, ३१ जानेवारी रोजी या मालमत्तांचा लिलाव होणार आहे.

वारंवार आवाहन करूनही कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता कर संकलन कार्यालयाने लाखबंद (सील) करून जप्त केल्या आहेत. त्यानंतरही मालमत्ताधारकांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने महापालिकेने त्या मालमत्तांचा लिलाव जाहीर केला आहे. ४३ मालमत्तांची यादी प्रसिद्ध केली. त्यात २३ निवासी व २० बिगरनिवासी मालमत्ता आहेत. मालमत्ताधारकांकडे एक लाख ते आठ लाखांपर्यंतची थकबाकी आहे. त्यात प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक, संस्था, व्यक्ती यांच्या निगडी, आकुर्डी, चिंचवड, वाल्हेकरवाडी, पिंपरी भाजी मंडई, मोरवाडी, दापोडी, कासारवाडी, चोविसावाडी, चऱ्होली, वडमुखवाडी, संतनगर, मोशी, किवळे, मामुर्डी, रावेत, दिघी, बोपखेल, वाकड येथील मालमत्ता आहेत.




# लाडक्या बहिणीच्या घरावर दरोडा

## कमाईचा शॉर्टकट भोवला, जुगारी भावाला बेड्या

**। पिंपरी-चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

बीड जिल्ह्यातील भावाने त्याच्या लाडक्या बहिणीच्या घरी चोरी केल्याचे उघड झाले. या घटनेने बहिणीला मोठा धक्का बसला. या भावाला जुगाराचे व्यसन आहे. त्याने गावाकडील पाच एकर शेती जुगारात घालवली, आणखी पैशांची गरज पडली म्हणून सख्ख्या




बहिणीच्या घरी चोरी केली श्रीकांत दशरथ पांगरे असे आरोपीचे नाव आहे. तो पुण्यात डिलिव्हरी बॉय म्हणून काम करत होता. त्याल ऑनलाईन जुगाराचे व्यसन आहे. पिंपरी चिंचवड पोलिसांनी याप्रकरणी कारवाई करत त्याला बेड्या ठोकल्या. श्रीकांत पांगरे हा मुळचा गेवराई तालुक्यातील कुंभे जळगाव येथील रहिवाशी आहे. त्याला ऑनलाईन जुगाराचे व्यसन लागले. त्यात पाच एकर जमीन विकावी लागली. त्यानंतर तो पुण्यात डिलव्हरी बॉय म्हणून काम करू लागला. पण त्याचे ऑनलाईन जुगाराचे व्यसन संपले नाही. जुगार खेळून हरलेली रक्कम परत मिळवण्यासाठी त्याने आणखी जुगार खेळण्यास सुरुवात केली. तिथे पैसे कमी पडू लागले म्हणून त्याने चक्क सख्ख्या बहिणीच्या घरी चोरी केली. 13 जानेवारी वाल्हेकरवाडी येथील हाऊसिंग सोसायटीत चोरी झाली. या प्रकरणात चिंचवड पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी सर्व पाहणी केली. घरात सर्वच गोष्टी जागच्या जागी होत्या. कुठेही तोडफोड नव्हती. दरवाज्याचे कुलूप-कोंडे व्यवस्थित होते. दुपारच्या वेळी गुपचूप घरात येऊन कोणी चोरी करण्याची शक्यता दिसत नव्हती. पोलिसांनी घरातील सदस्यांची चौकशी केली.

